दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र |बुधवार , 30 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 138 |वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज सबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com



# छत्रपती संभाजी महाराज चौकात घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य; नागरिक त्रस्त

## नालीचे पाणी रस्त्यावर साचल्याने विद्यार्थी, नागरिक व भाविकांना त्रास; प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करावी – सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी महाराज चौक परिसरात घाणीचे व दुर्गंधीचे साम्राज्य निर्माण झाले असून, प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन नालीच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे. या समस्येमुळे विद्यार्थी, नागरिक तसेच परळीत येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील उड्डाणपुलाच्या बाजूने इराणी वस्ती व शिवाजीनगर भागातून येणारे नालीचे पाणी थेट इटके कॉर्नर चौक परिसरात येत आहे. हे पाणी रस्त्यावर साचत असल्याने परिसरात चिखल, घाण आणि दुर्गंधी पसरली आहे. नागरिकांना या साचलेल्या दूषित पाण्यातून मार्ग काढावा लागत आहे.

परळी शहरात विविध साथीचे आजार तसेच डेंग्यूची भीती असताना रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने होत नसल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, प्रशासनाने तातडीने स्वच्छता व पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

परळीत येणाऱ्या नागरिक व भाविकांचे घाण पाण्यातून मार्ग काढत स्वागत होत आहे, अशी परिस्थिती निर्माण झाली असून, शहराची प्रतिमा खराब होत असल्याचे बालाजी चाटे यांनी म्हटले आहे. विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वाहनचालकांना दररोज या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

नगरपरिषद व संबंधित प्रशासनाने या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून नालीच्या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करावा, रस्त्यावर साचलेले पाणी हटवावे तसेच परिसराची स्वच्छता करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी सरकार आवश्यक ती सर्व पावले उचलत आहे

## पालकमंत्री ना . पंकजाताई मुंडेंनी जालन्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केली पीक परिस्थितीची पाहणी ; बळीराजाला दिला आधार

■ जालना प्रतिनिधी

पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेल्या भागाची राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज पाहणी केली. शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, सरकार मदतीसाठी आवश्यक ती सर्व पावले उचलत आहे अशा शब्दांत त्यांनी बळीराजाला धीर दिला.

पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज बदनापुर तालूक्यातील कडेगाव, गेवराई बाजार आणि गोकुळवाडी तसेच जालना तालुक्यातील गणेशनगर शिवारातील शेतांमध्ये जाऊन पिकांची स्थिती जाणून घेतली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी शेतकरी बांधवांना आधार देत त्या म्हणाल्या की, नुकसानग्रस्त पिकांची अवस्था पाहिल्यानंतर परिस्थिती गंभीर आहे. परंतु शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. राज्य शासनाकडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जाच्या वसुलीला स्थगिती आणि कृषीपंपांच्या चालू वीजबिलात सवलत देण्याचा समावेश आहे.



### पाणी आणि चाऱ्याचे योग्य नियोजन

■ पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा यासाठी प्रशासकीय स्तरावर नियोजन केले जात आहे. ज्या भागात चाऱ्याची तीव्र टंचाई आहे, तिथे तातडीने चारा डेपो सुरू करणे आणि गाळपेरा जमिनींचा योग्य वापर करण्याबाबत धोरण आखले जात असल्याचे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. शेतकरी आणि शेतमजुरांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बँक खात्यात तांत्रिक त्रुटी नसलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना मदतनिधीचे वाटप वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी आमदार अर्जून खोतकर, भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भास्कर दानवे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा अधिक्षक गहिनीनाथ कापसे, बदनापुर उपविभागीय अधिकारी लता बागुल यांच्यासह अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात दुष्काळ : अधिकाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास सक्त मनाई ; पूर्वपरवानगीशिवाय रजेवर गेलेल्यांवर फौजदारी कारवाईचा इशारा

■ बीड प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह संपूर्ण जिल्ह्यात सद्यःस्थितीत गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, पाणीटंचाई, चाराटंचाई आणि पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहेत.
या पार्श्वभूमीवर शासनाने बीड जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांत विविध सवलती लागू केल्या आहेत. ही गंभीर आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता, प्रशासकीय यंत्रणा सतर्क व गतिमान ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष विवेक जॉन्सन यांनी एक कठोर परिपत्रक जारी केले आहे.

या आदेशानुसार महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, शिक्षण, पुरवठा, सहकार व पाणीपुरवठा यांसारख्या महत्त्वाच्या विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मुख्यालय न सोडण्याचे कडक निर्देश देण्यात आले आहेत.

रजा मंजुरीचे सर्वाधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे: सद्यःस्थितीत दुष्काळी आणीबाणी संपेपर्यंत संबंधित सर्व अधिकाऱ्यांची कोणतीही रजा (अतितातडीची वैद्यकीय रजा वगळता) केवळ जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वपरवानगीनेच मंजूर केली जाईल.

मुख्यालय सोडण्यास बंदी: सर्व क्षेत्रीय व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी पूर्णवेळ हजर राहून पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याची कामे सर्वोच्च प्राधान्याने पार पाडावीत. विनापरवानगी गैरहजेरीवर दुहेरी कारवाई: पूर्वपरवानगीशिवाय मुख्यालय सोडणाऱ्या किंवा रजेवर जाणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, 1979' अन्वये निलंबन व विभागीय



चौकशीची कारवाई केली जाईल. फौजदारी गुन्हा दाखल होणार: दुष्काळ हा अधिसूचित आपत्ती प्रवर्गात येत असल्याने, कर्तव्यात कसूर करणाऱ्या किंवा आपत्ती निवारण कार्यात बाधा आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005' च्या कलम ५१, ५५ व ५६ नुसार तात्काळ दंडात्मक व दखलपात्र फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करण्यात येईल.

प्रशासन दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांच्या पाठीशी असून सर्व अधिकाऱ्यांनी संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने ऐकून घेत त्यांचा जागेवरच निपटारा करावा, असे निर्देश जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## संपादकीय

# हंगेरीतील सत्तांतराचा अमेरिकेला धक्का

युरोपमधील हंगेरी या छोट्या देशातील ताज्या निवडणूक निकालांचे पडसाद केवळ त्या देशापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर त्याचे प्रतिध्वनी थेट अमेरिकेपर्यंत ऐकू येत आहेत. पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांचा पराभव हा जागतिक राजकारणातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. कारण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासह अनेक प्रभावशाली नेते ऑर्बन यांचे उघड समर्थक राहिले आहेत. हा पराभव काय सांगतो?

हंगेरीचे मावळते पंतप्रधान व्हिक्टर ऑर्बन यांनी सत्तेचा वापर करून माध्यमे, न्यायव्यवस्था आणि निवडणूक यंत्रणा यांच्यावर प्रभाव टाकत जवळपास सोळा वर्षे सत्तेवर पकड कायम ठेवली. त्यांच्यात आणि ट्रम्प यांच्या राजकीय कार्यक्रमपत्रिकेत साम्य आढळते, ही बाबही अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली होती. ट्रम्प यांनी ऑर्बन यांच्या पुनर्निवडीसाठी जोरदार पाठिंबा दर्शवला होता. अगदी इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवरही अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांना हंगेरीच्या बुडापेस्ट येथे पाठवून त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. तथापि, ऑर्बन यांच्या पराभवाने वेगळेच वास्तव अधोरेखित केले. जागतिक संघर्षांच्या छायेत परदेशातील राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची अमेरिकेची क्षमता मर्यादित होत चालली आहे. या निकालाचे व्यापक परिणाम होणार हे निश्चित. ऑर्बन हे रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांचे युरोपमधील निकटचे सहयोगी मानले जात होते. त्यांनी युरोपीय महासंघाकडून युक्रेनला मिळणाऱ्या मदतीत अडथळे निर्माण केले होते. त्यांच्या पराभवामुळे युरोपीय राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या निकालाचे स्वागत अमेरिकेतील दोन्ही प्रमुख पक्षांकडून करण्यात आले. काही नेत्यांनी तर इतर लोकशाही देशांच्या निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करण्याच्या धोरणावरच टीका केली. लोकशाही व्यवस्थेत अखेरीस जनतेचीच भूमिका निर्णायक ठरते, असा व्यापक संदेश यावरुन जातो. राजकीय तज्ज्ञांच्या मते, सध्याच्या अस्थिर जागतिक वातावरणात सत्ताधाऱ्यांविरोधातील असंतोष वाढत आहे. आर्थिक अडचणी, महागाई आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे मतदार बदलाची मागणी करत आहेत. हंगेरीतील निकाल याच व्यापक प्रवाहाचा भाग मानला पाहिजे. लोकशाहीमध्ये कुणीही 'अपराजित' नसतो. वेळ आल्यास जनता सत्तांतर घडवून आणते, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. ट्रम्प आणि पुतीन यांच्यासारख्यांचा पाठिंबा, हंगेरीतील माध्यमे ताब्यात, सत्तेचे केंद्रीकरण असे सर्व प्रकार असतानाही जनतेने ऑर्बन यांची १६ वर्षांची सत्ता उलथवून टाकली. जनतेला गृहीत धरणे चुकीचे असते, हा संदेश हंगेरीच्या निवडणुकीने जगाला दिला. हंगेरीच्या राजकारणात नुकत्याच घडलेल्या सत्तांतराने युरोपीय राजकीय पटावर एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. जवळपास १६ वर्षे सत्तेवर असलेल्या व्हिक्टर ऑर्बन यांच्या नेतृत्वाखालील फिडेज या पक्षाला पराभवाचा धक्का बसणे हा केवळ निवडणूक निकाल नसून, दीर्घकाळ एकाच विचारसरणीच्या वर्चस्वाला मिळालेला जनतेचा प्रतिसाद मानावा लागेल. ऑर्बन यांच्या कारकिर्दीमध्ये 'बिनउदारमतवादी लोकशाही' ही संकल्पना पुढे आली. राष्ट्रवाद, सांस्कृतिक परंपरा आणि स्थलांतरविरोधी भूमिका या त्रिसूत्रीवर त्यांनी आपली राजकीय घडी बसवली. युरोपीय महासंघासोबतचे त्यांचे संबंध अनेकदा तणावपूर्ण राहिले. न्यायव्यवस्थेतील हस्तक्षेप, माध्यम स्वातंत्र्यावरील निर्बंध आणि नागरी स्वातंत्र्यांवरील मर्यादा यामुळे हंगेरीवर वारंवार टीका झाली; मात्र देशांतर्गत पातळीवर त्यांनी आर्थिक स्थैर्य, रोजगार आणि पारंपरिक मूल्यांचे रक्षण यांची मांडणी करून जनाधार टिकवून ठेवला. या निवडणुकीत विरोधकांनी प्रथमच एकसंध आघाडी उभी केली. विविध विचारधारांचे पक्ष एकत्र येऊन सत्ताधारी व्यवस्थेविरुद्ध लढले. या नव्या राजकीय पर्यायाने मतदारांना 'पर्याय' उपलब्ध करून दिला, जो गेल्या अनेक वर्षांमध्ये नव्हता. दीर्घकाळ एकाच पक्षाच्या वर्चस्वामुळे निर्माण झालेली अस्वस्थता, सत्तेचे केंद्रीकरण आणि पर्यायांचा अभाव या घटकांनी मिळून बदलाची पायाभरणी केली. सत्ताधाऱ्यांनी माध्यमे आणि संस्थांवर प्रभाव टाकला असला, तरी डिजिटल माध्यमे आणि सामाजिक नेटवर्किंग प्लॅटफॉर्ममुळे माहितीचे पर्यायी स्रोत उपलब्ध झाले. यामुळे जनमत तयार करण्यात पारंपरिक माध्यमांच्या प्रभावाला मर्यादा आल्या. नव्या सत्ताधाऱ्यांसमोर आव्हानांची कमतरता नाही. आर्थिक स्थैर्य टिकवणे, युरोपीय महासंघाशी संबंध सुधारणा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाही संस्थांवरचा विश्वास पुनर्स्थापित करणे ही त्यांची प्राथमिक जबाबदारी असेल. विविध विचारसरणींच्या आघाडीला एकत्र ठेवणे हेही सोपे काम नाही. अंतर्गत मतभेद आणि धोरणात्मक विसंगती यामुळे सरकार अस्थिर होण्याची शक्यता कायम राहील. हंगेरीचा हा राजकीय बदल जागतिक पातळीवरही महत्त्वाचा संदेश देतो. लोकशाहीमध्ये कितीही मजबूत वाटणारी सत्ता असली, तरी जनतेचा कौल अंतिम असतो. राष्ट्रवाद आणि केंद्रीकरणाच्या राजकारणाला मर्यादा असतात आणि वेळोवेळी लोकशाही स्वतःचे संतुलन स्वतः साधते, हे या निकालाने अधोरेखित केले. हंगेरीतील सत्तांतर केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता युरोप तसेच जगातील लोकशाही प्रक्रियेतील बदलत्या प्रवाहांचे प्रतिबब आहे. आता खऱ्या अर्थाने कसोटी नव्या सत्ताधाऱ्यांची आहे. ते बदलाची आशा पूर्ण करतात की पुन्हा जुन्याच चक्रात अडकतात, हे येणारा काळच ठरवेल. सर्वात सूक्ष्म घटक म्हणजे राष्ट्रवादाची पुनर्रचना. वर वर पाहता हा निकाल उदारमतवादाचा विजय वाटू शकतो; पण वास्तव अधिक गुंतागुंतीचे आहे. तिस्झा पक्षाचे नाव आणि 'मॅग्यार' हे आडनाव हंगेरीच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ओळखीशी घट्ट जोडलेले आहे. म्हणजेच ऑर्बन यांची व्यवस्था संपवणारी शक्ती बाहेरून आली नव्हती, तर हंगेरीच्या आतून, त्याच राष्ट्रवादी भावनेतून उभी राहिली. हंगेरीतील सत्तांतराचा शेवटचा टप्पा समजून घेताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. ही केवळ निवडणुकीची कथा नाही, तर समाज, विचारसरणी आणि राजकीय मर्यादांची कहाणी आहे.

ऑर्बन यांची दीर्घकाळ टिकलेली सत्ता केवळ संस्थात्मक नियंत्रणावर आधारित नव्हती, तर तिच्या पाठीशी एक खोल सामाजिक आधार होता. साम्यवादानंतरच्या काळात हंगेरीमध्ये उदारमतवादी बदल झाले; पण त्या बदलांनी सर्वांना समान लाभ दिला नाही. अनेकांसाठी तो काळ अस्थिरतेचा, विषमतेचा आणि मोठ्या प्रमाणावर स्थलांतराचा होता. त्यामुळे 'मजबूत राष्ट्रवादी राज्य' ही कल्पना लोकांना सुरक्षिततेची हमी देणारी वाटू लागली.

# मत वाचवा, लोकशाही वाचवा'; मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा; काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष बहादूर भाईंची मागणी

## 'वोट चोरी'च्या आरोपांची निष्पक्ष चौकशी करा; बहादूरभाई

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

**"निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत जनतेच्या मनात प्रश्न निर्माण झाले आहेत. मतदारांच्या हक्कांचे संरक्षण आणि लोकशाहीवरील विश्वास कायम ठेवण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. 'वोट चोरी'च्या आरोपांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे." बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई यांनी केली आहे. मतदारांच्या हक्कांशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.**

**याबाबत अधिक माहिती अशी की, निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेबाबत जाब विचारण्याची गरज**



**असल्याचे बहादूर भाई यांनी म्हटले. मतदार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू असून त्याच्या मतदानाच्या अधिकाराचे संरक्षण करणे आवश्यक आहे. मतदार यादीतील बदल, नावांची वगळणी अथवा अन्य कोणत्याही प्रक्रियेत पारदर्शकता असावी, अशी भूमिका त्यांनी मांडली. काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, खासदार राहुल गांधी, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी खासदार तथा काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्या रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकदादा पाटील, महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आदित्यदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या पुढाकरातून ही मागणी करण्यात आल्याचे बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई यांनी सांगितले.**

**'मत वाचवा, लोकशाही वाचवा, संविधान वाचवा' असा नारा देत काँग्रेसकडून या मुद्द्यावर आंदोलनाची भूमिका घेतली जात असल्याचे बहादूर भाई यांनी सांगितले.**

**मतदारांच्या हक्कावर गदा आल्यास काँग्रेस रस्त्यावर उतरून जाब विचारेल, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या Special Intensive Revision (SIR) प्रक्रियेबाबतही काँग्रेसकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. निवडणूक आयोगाच्या अधिकृत माहितीनुसार SIR-2026 अंतर्गत मतदार यादीची प्रक्रिया सुरू असून मतदारांना आपले नाव तपासण्याची सुविधा उपलब्ध आहे. SIRच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप बहादूर भाई यांनी केला असून, अशा प्रकरणांची पारदर्शकपणे पडताळणी व्हावी, अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा उपाध्यक्ष हनिफ करीम सय्यद उर्फ बहादूर भाई यांनी केली आहे.**

# भारतीय गोलंदाजाची आयसीसी क्रमवारीत मोठी झेप

## आजवरचे सर्व विक्रम मोडले..! भारतीय गोलंदाजाची आयसीसी क्रमवारीत मोठी झेप

■ मुंबई वृत्तसंस्था

भारतीय महिला संघाची स्टार फिरकीपटू श्री चरणी सध्या जबरदस्त फॉर्मात आहे.त्याचं फळंही तिला मिळताना दिसत आहे. आयसीसी टी20 आंतरराष्ट्रीय क्रमवारीत श्री चरणीने ऐतिहासिक नोंद केली आहे. आयसीसीने जारी केलेल्या क्रमवारीत तिने पहिलं स्थान पटकावलं आहे. पण यासह तिने आजवरचे सर्व विक्रमही मोडीत काढले आहेत. टी20 क्रमवारीत सर्वाधिक प्वाइंट्स मिळवणारी गोलंदाज ठरली आहे. श्री चरणीने 817 रेटिंग प्वॉइंटसह पहिलं स्थान पटकावलं आहे. आतापर्यंत टी20 क्रमवारीत मिळवलेले सर्वाधिक गुण आहेत. आतापर्यंत हा पल्ला कोणत्याही खेळाडूला गाठता आलेला नाही. इतकंच काय तर ऑस्ट्रेलियाची वेगवान गोलंदाजी मेगन शूट हीचा विक्रमही मोडीत काढला आहे. मेगनने 2018 या वर्षी 806 गुण मिळवले होते. आतापर्यंत हा महिला क्रिकेटमधील मोठा विक्रम होता. मात्र हा विक्रम श्री चरणीच्या नावावर झाला आहे. श्री चरणीने आपल्या चमकदार कामगिरीने हा पल्ला गाठला आहे.




भारतीय महिला संघाने आशिया कप स्पर्धेनंतर एशियन गेम्स स्पर्धेतही जेतेपद मिळवलं आहे. या दोन्ही स्पर्धांमध्ये श्री चरणी आपल्या फिरकीची छाप सोडली. आशिया कप स्पर्धेत श्री चरणीने एकूण 12 विकेट काढल्या होत्या. श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात श्री चरणीने 20 धावा देत 4 विकेट घेतल्या. एशियन गेम्स स्पर्धेत जापानविरुद्धच्या सामन्यात 10 धावा देत 4 विकेट काढल्या होत्या. ही तिची या फॉर्मेटमधील सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. श्रीलंकेविरुद्धच्या गोल्डन पदकाच्या सामन्यातही तिने 2 विकेट काढल्या होत्या. तिच्या या कामगिरीचा फायदा तिला गुणांकनात झाला आणि 817 रेटिंग प्वाइंट मिळाले. वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेचं यजमानपद तीन देशांकडे आहे. दक्षिण अफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया हे देश यजमान आहेत. ही स्पर्धा ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान ...

### दीप्ति शर्माचं योगदान

भारताची अष्टपैलू खेळाडू आणि फिरकी गोलंदाज दीप्ति शर्मा हीनेही आपल्या गोलंदाजीची छाप सोडली आहे. दीप्ती शर्माच्या नावावर 754 गुण आहेत. यासह ती आयसीसी गोलंदाजांच्या क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर आहे. दीप्ति शर्माने एशियन गेम्स स्पर्धेत श्रीलंकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात तीन विकेट काढल्या होत्या. त्याचा फायदा तिला गुणांकनात झाला. तिसऱ्या क्रमांकावर इंग्लंडची सोफी एक्लेसटन असून तिचे 732 रेटिंग प्वॉइंट आहेत. तर इंग्लंडच्या चार्ली डीनचे 722 आणि इयान बेलचने 712 रेटिंग प्वॉइंट आहे. चार्ली चौथ्या, तर इयान पाचव्या क्रमांकावर आहे.

# वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेच्या वेळापत्रकाची या तारखेला होणार घोषणा

■ मुंबई वृत्तसंस्था

वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेचं यजमानपद तीन देशांकडे आहे. दक्षिण अफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया हे देश यजमान आहेत. ही स्पर्धा ऑक्टोबर-नोव्हेंबर दरम्यान होईल, अशी माहिती पुढे आली होती. पण नेमकी कधी ते कोणालाच माहिती नाही. अशा स्थितीत या स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघांनी त्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भारतीय संघही कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वात तयारी करत आहे. असं असताना या स्पर्धेच्या वेळापत्रकाची घोषणा अवघ्या काही तासांवर येऊन ठेपली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट काउंसिल अर्थात आयसीसी 1 ऑक्टोबर 2026 रोजी या स्पर्धेच्या वेळापत्रकाची घोषणा करणार आहे. यासह तिकिटांसह बॅलेटही सुरू होणार आहे. पण तिकीट खरेदीसाठी उपलब्ध नसतील, पण फॅन्स रजिस्टर मात्र करू शकतील.

वनडे क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान 10 शतकं ठोकूनही शुभमन गिल अनलकी! असं का म्हणाला आर अश्विन? वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेच्या दृष्टीने भारतीय संघाची बांधणी केली जात आहे. त्याचीच चाचपणी म्हणून आता प्रत्येक वनडे मालिका महत्त्वाची आहे. त्या दृष्टीने वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेला 2 ऑक्टोबर 2027 पासून सुरूवात होण्याची शक्यता आहे. महात्मा गांधी यांच्या जयंतीचं औचित्य आणि दक्षिण अफ्रिकेतील त्यांचं योगदान लक्षात ठेवून ही तारीख निवडली जाणार असल्याचं बोललं जात आहे. ऑक्टोबरमध्ये सुरु होणाऱ्या या स्पर्धेची सांगता नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. या स्पर्धेच्या जेतेपदाची लढत 21 नोव्हेंबरला होण्याची शक्यता आहे. वर्ल्डकप मध्ये सहभागी होणाऱ्या 14 पैकी 10 संघ हे 30 सप्टेंबरला निश्चित होतील. यात दोन यजमान देश असतील. यात दक्षिण अफ्रिका आणि झिम्बाब्वे हे देश असतील. बाकीचे आठ देश आयसीसी वनडे रँकिंगनुसार ठरतील. तर उर्वरित चार संघ पात्रता फेरीतून समोर येतील आणि त्यापैकी दोन संघ अंतिम स्पर्धेत खेळतील. विशेष म्हणजे यजमान असलेल्या नामिबिया या स्पर्धेत पात्र होणं कठीण आहे. वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेच्या दृष्टीने भारतीय संघाची बांधणी केली जात आहे. त्याचीच चाचपणी म्हणून आता प्रत्येक वनडे मालिका महत्त्वाची आहे. त्या दृष्टीने ...

वनडे वर्ल्डकप 2027 स्पर्धेसाठी सध्याची रँकिंग पाहाता अफगाणिस्तानही पात्र ठरेल. नवव्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशलाही संधी मिळेला. भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, श्रीलंका, अफगाणिस्तान हे संघ आयसीसी क्रमवारीनुसार पात्र ठरतील. तर नवव्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशला दक्षिण अफ्रिकेमुळे लाभ मिळणार आहे. कारण यजमान देश असल्याने या क्रमवारीत धरला जाणार नाही. त्यामुळे नवव्या क्रमांकावर असलेल्या बांगलादेशला थेट तिकीट मिळेल. तर वेस्ट इंडिजला पात्रता फेरीतून या स्पर्धेत जागा मिळवावी लागणार आहे.



# एकवीरा देवी संस्थांच्या वतीने 31 हजारांचा धनादेश मुख्यमंत्र्यांच्या सहायता निधी जमा



■ महागाव प्रतिनिधी

राज्यात ओढवलेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे बळीराजाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. या कठीण काळात शेतकऱ्यांना खारीचा का होईना हातभार लागावा, यासाठी हिवरा संगम येथील श्री. एकविरा देवी संस्थानच्या वतीने साहेबराव पाटील हिवरेकर यांच्यामार्फत मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ३१,००० रुपयांचा धनादेश नुकताच मा, चंद्रशेखरजी बावनकुळे साहेब महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना सुपूर्द करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील हे पहिलेच संस्थान आहे ज्याने सामाजिक बांधिलकी जपत पुढे येऊन ही मदत केली आहे. संस्थानचा हा आदर्श इतर धार्मिक व सामाजिक संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. संकटाच्या या काळात आपल्या बळीराजाला धीर देऊया, कारण... "शेतकरी जगला तरच देश जगेल!"

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# परळी वैजनाथ-धर्मापुरी राष्ट्रीय महामार्ग (एनएच-361एच) लगत सारडगाव येथील रस्त्याची दुरवस्था









परळी वैजनाथ-धर्मापुरी राष्ट्रीय महामार्ग (एनएच-361एच) लगत सारडगाव येथील रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून संबंधित ठेकेदाराने सुमारे 10 मीटर रस्त्याचे काम अपूर्ण ठेवले आहे

तर ननंज पाटी ते सारडगांव वस्ती आंदाजे 1 किलोमीटरचे काम हे निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे

परिणामी या ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले असून पावसाचे पाणी साचत असल्याने सातत्याने अपघात घडत आहेत दुचाकी वरुण प्रवास करत आसताना मागे बसलेल्या महिला आणि वयस्क व्यक्ती खड्यातील धक्यांमुळे पडुण जखमी होत आहेत

या गंभीर परिस्थितीमुळे संतप्त झालेल्या सारडगाव ग्रामस्थांनी रस्ता तातडीने दुरुस्त न केल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

परळी-धर्मापुरी हा एनएच-361एच राष्ट्रीय महामार्ग मिरवट, मांडवा, नंदनज, सारडगाव मार्गे रेणापूर फाट्यापर्यंत सुमारे 52.8 किलोमीटरचा आहे.

या मार्गावरील सारडगाव हे देशभर लिंबू उत्पादनासाठी प्रसिद्ध असून संत केदारी महाराजांचे जागृत देवस्थान असल्याने वर्षभर भाविकांची मोठी वर्दळ असते.

मात्र गावालगतचा रस्ता धोकादायक बनल्याने नागरिकांसह भाविकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदार, जिल्हा परिषद सदस्य तसेच आमदारांकडे वारंवार मागणी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. याबाबत बोलताना सारडगावचे सरपंच राजाभाऊ आघाव यांनी सांगितले की, रस्त्यावर पाणी साचणे, मोठमोठे खड्डे आणि अपूर्ण काम यामुळे रोज अपघात होत आहेत. ग्रामस्थांच्या जीवाशी खेळ सुरु असून प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी अन्यथा संपूर्ण गावाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल आसा सरपंच राजभाऊ आघाव यांनी इशारा दिला आहे यावेळी सरपंच राजाभाऊ आघाव उपसरपंच संदीप तांदळे यांच्यासह माजी,ग्रामपंचायत सदस्य,श्री ज्ञानोबा केंद्रे, ग्रा.सदस्य बाळू आघाव, शिवहर आघाव, बिभीषण तांदळे, कालीदास तांदळे, निवृत्ती डोळे, भगवान मुंडे, माजी सरपंच सिद्धेश्वर आघाव, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर मुंडे, राजू आंधळे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नवमतदार नोंदणीसाठी न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयात शिबिर

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

येथील न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालयात नवमतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, यासाठी या शिबिराच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. आर. चव्हाण यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लोकशाही व्यवस्थेतील नवमतदारांची भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील महत्त्वाचा अधिकार असून, प्रत्येक पात्र नागरिकाने मतदार म्हणून नोंदणी करून मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रविशंकर स्वामी, ज्येष्ठ प्राध्यापक कोकलगावे सर, प्रा.मुंडे, प्रा. नेरकर, प्रा. बिराजदार, प्रा.राऊत, प्रा. खंडागळे मॅडम यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते.या शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे नोडल अधिकारी प्रा. बाळासाहेब देशमुख यांनी केले. यावेळी नवमतदार विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने मतदार नोंदणी अर्ज भरावेत, असे आवाहन करण्यात आले.

# स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्था : 134 कोटी 57 लाखांची आर्थिक उलाढाल तर 54 लाख 76 हजार निव्वळ नफा

**सभासदांना 10 टक्के लाभांश जाहीर ; ग्राहक व ठेवीदारांच्या विश्वासावर प्रगतीची वाटचाल -बाजीराव (भैय्या) धर्माधिकारी**

**परळी वैजनाथ /प्रतिनिधी**

शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकीग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख समृद्ध करत स्वा. वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेने सरत्या आर्थिक वर्षात मार्च 2026 अखेर उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. 134 कोटी 57 लाखांचीआर्थिक उलाढाल तर 54 लाख 76 हजार निव्वळ नफा असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत दिली.

स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी सरत्या आर्थिक वर्षातील मार्च 2026 अखेर चा ताळेबंद सादर करण्यात आला. सरत्या आर्थिक वर्षात 31 मार्च 2026 अखेर संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. विषेश म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी- 45 कोटी 67 लाख,,कर्ज 38 कोटी 69 लाख, गुंतवणूक 15 कोटी 74 लाख, आर्थिक उलाढाल134 कोटी 57 लाख, राखीव निधी 9 कोटी 23 लाख,भाग भांडवल-67 लाख 13 हजार ,खेळते भांडवल-56 कोटी 30 लाख ,निव्वळ नफा 54 लाख 76 हजार, सीडी रेशो 64.03% तर लाभांश 10% इतका आहे. पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले.

यापुढेही हा विश्वास सार्थ ठरवून वाटचाल करु अशी ग्वाही पतसंस्थेचे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली. यावेळी उपाध्यक्ष अनिल आष्टेकर,सचिव जितेंद्र नव्हाडे ,कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे, राजाभाऊ मराठे, दशरथ होळकर, डॉ. सौ. श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारी आदींची उपस्थिती होती. संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी यांनी वार्षिक आहवाल सभेसमोर मांडला.या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषयसूचीनुसार चर्चा करण्यात आली. यावेळी सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# ऊस उत्पादक शेतकऱ्यांना 5100 भाव द्या - ॲड. सचिन नाईक

**महागाव** | यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी व महागाव तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने महागाव ,उमरखेड, पुसद तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति टन रुपये 5100 भाव वाढ देण्याची मागणी करण्याची निवेदन नॅचरल शुगर युनिट ,गुंज मॅनेजिंग डायरेक्टर कदम यांच्याशी चर्चा करून काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांच्या नेतृत्वात तालुकाध्यक्ष सुनील राठोड, भगवान पंडागळे, महेंद्र कावळे, केदार पानपटे, समाधान राऊत यांच्यासह काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# राजुरेश्वरचरणी 6 लाख भक्तांनी घेतले दर्शन

अंगारक चतुर्थीनिमित्त श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र राजूर येथील राजुरेश्वराच्या दर्शनासाठी सुमारे सहा लाख भाविकांनी हजेरी लावली. प्रत्येक अंगारकी चतुर्थीला राजुरात १० ते १२ लाख भाविकांची गर्दी होत होते. मात्र, ही अंगारकी चतुर्थी पितृपक्षात आल्याने भाविकांच्या संख्येत घट झाली. तरीही संभाव्य गर्दी लक्षात घेऊन गणपती संस्थान व प्रशासनाने दर्शन व्यवस्था, पाणी, आरोग्य आणि सुरक्षेच्या दृष्टीने जय्यत तयारी केली होती.

सोमवारी रात्रीपासूनच राजुरेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढली. रात्री ७ वाजता दर्शनासाठी रांग सुरू झाली. मध्यरात्री १२ वाजता राजुरेश्वराची महापूजा व महाआरती झाल्यानंतर भाविकांसाठी दर्शन खुले करण्यात आले. मंदिरापासून झिग-झॅग दर्शन रांगेत सुमारे अर्धा किलोमीटरपर्यंत भाविकांची रांग लागली होती. दर्शनासाठी भाविकांना एक तासाचा वेळ लागत होता. जालना, छत्रपती संभाजीनगर, सिल्लोड, अजिंठा, देऊळगाव राजा, जाफराबाद, बीड, परभणी, बुलढाणा, जळगाव आदी भागांतून भाविक पायी राजुरात दाखल झाले. यामध्ये महिला भाविकांची संख्या लक्षणीय होती. यंदा दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे.अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने आलेल्या भाविकांनी राजुरेश्वराकडे पावसासाठी साकडे घातले आहे.

# निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - विभागीय आयुक्त जी.श्रीकांत

**छत्रपती संभाजीनगर** | औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया सुरळीत व सुरक्षितपणे पार पाडण्यासाठी सर्व संबंधित पथकांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली नोडल अधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, रित्रा मेत्रेवार, देविदास टेकाळे, खुशालसिंह परदेशी तसेच विविध कक्षांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.

श्रीकांत म्हणाले की, नामनिर्देशन, छाननी, मतदान व मतमोजणीच्या प्रत्येक टप्प्याची तयारी वेळेत पूर्ण करावी. नामनिर्देशन अर्जांची काटेकोर तपासणी, मतदार यादीत




नाव शोधण्याची सुविधा, मतदान साहित्य व मतपेट्यांची सुरक्षित वाहतूक तसेच मतमोजणी केंद्रावरील व्यवस्थेकडे विशेष लक्ष द्यावे. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेत प्रशिक्षण देऊन त्यांची तयारी पूर्ण करावी.

नामनिर्देशन कक्षात अर्जांचे वाटप व स्वीकार तसेच उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याची पुरेशी व्यवस्था ठेवावी. आवश्यक कागदपत्रे, चलन पावती, छायाचित्र व एबी फॉर्मची तपासणी करावी. उमेदवारांना शपथ देण्यासाठी अधिकारी नियुक्त करावेत. ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या छाननीसाठी तपासणी यादी तयार ठेवावी. अर्ज बाद झाल्यास कारणांसह आदेश देण्याची कार्यवाही करावी. नामनिर्देशनाची सूचना व संबंधित माहिती सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

मतदान व मतमोजणीसाठी वाहतूक आणि सुरक्षा व्यवस्था काटेकोरपणे करावी. मतदानानंतर मतपेट्या सुरक्षितपणे मतमोजणी केंद्रावर आणण्याची व्यवस्था करावी. मतमोजणी केंद्रावर ५६ टेबल्सची व्यवस्था करण्यात येत असून, संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण द्यावे. मतमोजणीच्या तीन दिवस आधी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घ्यावा.

पहिले प्रशिक्षण १० ऑक्टोबर, दुसरे १७ ऑक्टोबर आणि मतदान साहित्य वाटपाच्या दिवशी २२ ऑक्टोबर रोजी अंतिम प्रशिक्षण घेण्याचे नियोजन करावे. केंद्राध्यक्ष, क्षेत्रीय अधिकारी, सूक्ष्म निरीक्षक तसेच संबंधित पथकांना प्रशिक्षण द्यावे. मतमोजणीसाठी स्वतंत्र पथक तयार करून त्यांचे प्रशिक्षण १४ ऑक्टोबरच्या आसपास पूर्ण करावे. मतदान केंद्रांवर वेबकास्टिंगची व्यवस्था करावी.

उमेदवारांची संख्या ५६ पेक्षा जास्त झाल्यास मतपत्रिका व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या उपलब्धतेनुसार नियोजन करावे. निवडणुकीसाठी सुमारे ३० हजार मतपत्रिकांची आवश्यकता लागू शकते, त्यानुसार छपाईचे नियोजन करावे. निवडणूक साहित्य व आवश्यक शिक्क्यांचा पुरेसा साठा ठेवावा.

मतदानाची पद्धत तसेच कोणत्या कारणांमुळे मत बाद होऊ शकते, याबाबत मतदारांमध्ये जनजागृती करावी. निवडणूक कामासाठी आवश्यक मनुष्यबळाचे नियोजन करून कामाचे वाटप करावे. दररोज नामनिर्देशन अर्जांचे वाटप व प्राप्त अर्जांची माहिती माध्यमांना द्यावी. आचारसंहितेच्या काळात सर्व शासकीय कामकाज करताना निवडणूक आयोगाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

• बीड, बुधवार, 30 सप्टेंबर 2026


# संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या समाज मंदिरासाठी सर्वतोपरी मदत करू -ना.पंकजाताई मुंडे



## समरसता अभियान अंतर्गत श्री संत रविदास महाराज यांच्या 650 व्या जयंती निमित्त. ना.पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते कलश पुजन संपन्न

**परळी / प्रतिनिधी**

समरसता अभियान अंतर्गत श्री संत रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंती निमित्त कलश पुजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्य च्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते कलश पुजन शनिवार दिनांक 26 रोजी परळी येथे संत रविदास मंदिर सावतामाळी नगर येथील संपन्न झाले.

6 व्या शतकात संत शिरोमणी रविदाज यांनी समाजाला दिशा देण्यासाठी सर्व समाजातील घटकांना जनहितासाठी त्यांनी प्रबोधन केले. त्यांची प्रेरणा आजही समाजाला तितकीच गरजेची असल्याने त्यांचे स्मरण व्हावे यासाठी संत शिरोमणी रविदास महाराज यांच्या समाज मंदिरासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले ना .पंकजाताई मुंडे यांनी या वेळी केली.

भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी वाराणसीच्या भूमीची पवित्र कलश जिल्हाध्यक्ष तानाजी वाव्हळे यांना सुपुर्द केला. जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात समरसता अभियान अंतर्गत श्री संत रविदास महाराज यांच्या ६५० व्याजयंती निमित्त कलश पुजन कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे. याची परळी येथून सुरुवात कलश पुजन कार्यक्रम ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाली समरसता अभियान सर्वसमावेशक समाज, समृद्ध भारत कार्यक्रमांचे प्रस्ताविक बनसोडे यांनी केले.

सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती जमाती मोर्चा बीडचे जिल्हाध्यक्ष तानाजी वाव्हळे यांनी केले.

# महिला महाविद्यालयातील संगणक विभागात ऑनलाईन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**परळी** | येथील कै .लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयातील संगणक विभागात ऑनलाईन कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली .संशोधनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर काळाची गरज

'Use of AI in Research' हा विषय घेऊन ही ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करण्यांत आली .

संगणकशास्त्र विभागाच्या वतीने व IQAC च्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 'Use of AI in Research' या ऑनलाइन कार्यशाळेचे आयोजन उत्साहात संपन्न झाले . संशोधन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) प्रभावी वापर, आधुनिक AI साधनांची ओळख आणि त्यांचा संशोधन प्रक्रियेत प्रत्यक्ष उपयोग याबाबत तज्ज्ञ अभ्यासकांनी मार्गदर्शन केले . या कार्यशाळेसाठी Resource Person म्हणून डॉ. अनिकेत अविनाश मुळे , प्राध्यापक, स्कूल ऑफ मॅथेमेटिकल सायन्स , स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड हे लाभले . त्यांनी आपल्या वक्तव्यात सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना संशोधनाच्या विविध टप्प्यांमध्ये AI चा वापर कसा करता येतो, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. संशोधन विषयाची निवड, माहिती संकलन, साहित्याचा आढावा, संशोधन लेखन, माहितीचे विश्लेषण तसेच संशोधनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध AI साधनांचा उपयोग याबाबत त्यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.

या माध्यमातून सहभागीना विविध कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. AI चा वापर करताना संशोधनातील मौलिकता, अचूकता, संदर्भांची विश्वासार्हता आणि संशोधन नैतिकता यांचे महत्त्वही स्पष्ट करण्यात आले.

कार्यशाळेस कै लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा संजय देशमुख, सचिव मा रवींद्र देशमुख , कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख आणि प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयांतील सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ गोविंद कुलकर्णी व IQAC आणि आयोजन समितीने विशेष परिश्रम घेतले. आधुनिक तंत्रज्ञान आणि संशोधन यांची सांगड घालणारी ही कार्यशाळा सहभागींसाठी ज्ञानवर्धक, उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरली.




# कोव्हीड काळात कंत्राटी व नंतर रोजंदारी तत्वावर काम केलेल्या उमेदवारांना स्मार्ट सर्व्हिसेस कंपनी मार्फत भरतीमध्ये प्रथम प्राधान्य मिळावे

## रोजंदारी कामगारांचे मागणीपर अधिष्ठाता व उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

**अंबाजोगाई प्रतिनिधी :-** राज्यात सध्या सर्वच ठिकाणी खाजगी तथा कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अशाच प्रकारे अंबाजोगाई येथील स्वा रा ती ग्रामीण रुग्णालयात कंत्राटी स्मार्ट सर्व्हिसेस प्रा लि पुणे या कंपनीमार्फत कामगार भरती केल्या जात आहे. मात्र या भरती प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी अनियमितता झाल्याचे आढळून आल्याचा आरोप केला जात आहे. या कंपनीमार्फत झालेली भरती प्रक्रिया रद्द करण्यात यावी अशी मागणी कोव्हिडं काळात कंत्राटी पद्धतीने काम केलेल्या व त्यानंतर देखील रोजंदारी तत्वावर काम केलेल्या कामगारांनी उपजिल्हाधिकारी तथा अधिष्ठाता यांना निवेदनाद्वारे केली आहे.

सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की स्वा.रा.ती.ग्रा. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे कोव्हीड १९ या महामारी कालावधीपासून आम्ही वर्ग ४ (कंत्राटी) करीता काम केले आहे. काम करत असतानाच दि. ०७/०७/२०२१ रोजी कामावरून अचानकपणे आम्हाला कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा सलग दोन वर्षे रोजंदारी तत्वावर काम केले आहे. मात्र दि. ०१ मे २०२३ रोजी कामगार दिनादिवशीच सर्वांना कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर पुन्हा कामावर घेण्यासाठी कामगारांनी वेळोवेळी कार्यालयाशी पत्र व्यवहार केला आहे. मात्र कार्यालयातून जेंव्हा कधी जागा निघतील तेंव्हा आपला विचार प्राधान्याने केला जाईल असे आश्वासन अधिष्ठाता यांच्या वतीने देण्यात आले.

कालांतराने स्मार्ट सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे यांचे मार्फत कंत्राटी तत्वावरील चालू असलेल्या भरतीमध्ये कोव्हीड काळातील अनुभवी



कर्मचारी (कामगार) ज्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा दिली होती त्यांना अर्ज करुनही वगळण्यात आले आहे.यामुळे सदर कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी अधिष्ठाता यांनी आमची दखल घेवून व गांभीर्यपूर्वक विचार करुन उपर्युक्त कोव्हीड १९ कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्याची विनंती या निवेदनातून केली आहे. जर आमच्या विषयावर गांभिर्यपुर्वक विचार केला नाही तर अर्ज करूनही डावललेल्या सर्व कामगाराना दि ५ ऑक्टोबर २०२६ पासून कायद्याच्या मार्गाने उपोषणास बसण्याशिवाय आमच्याकडे काहीही पर्याय उरणार नसल्याचा गंभीर इशारा या कामगारांनी दिला आहे.

उपजिल्हाधिकारी तथा अधिष्ठाता याना सादर केल्याच्या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री तथा , उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य , पालकमंत्री बीड , खासदर बजरंग सोनवणे , वैद्यकीय शिक्षण मंत्री, संचालक , वैद्यकीय शिक्षण व प्रशासन विभाग, मुंबई, आमदार नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर महेश राम वेदपाठक, युवराज जगन्नाथ काळे , दुर्गेश कुरील, लक्ष्मण वाघमारे, राहुल राऊत, रामेश्वर माने, ज्ञानेश्वर खरात, इरफान पठाण, सतीश दरवेशवार, रोहित शिंदे, अशोक मेंडके, रामदास वाघमारे, प्रसाद आदाटे, रहमान शेख, दीपक लोंढे, योगेश गवळी, अमजीत शेख, लखन परदेशी, उत्तरेश्वर अदाटे, अमरदीप वाघमारे, योगेश हाके, बुद्धभूषण सरवदे, प्रशांत मोरे यांच्यासह अनेक जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# भक्तीची अनमोल पालखी भैरवनाथ चरणी अर्पण. ठोंबरे परिवाराचा भक्तिमय उपक्रम

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथील, व सध्याला पनवेल येथे स्थायिक असलेले हरी ओम फुड्स कंपनी, पनवेलचे सर्वेसर्वा बाबा ठोंबरे यांच्या वतीने तसेच दशरथ ठोंबरे, रघुनाथ ठोंबरे बबन ठोंबरे, आणि विलास ठोंबरे,यांच्या सहकार्याने श्री भैरवनाथ चरणी भव्य आणि आकर्षक पालखी अर्पण करण्यात आली.श्री भैरवनाथांच्या चरणी श्रद्धा आणि भक्तिभावाने अर्पण करण्यात आलेली ही पालखी खास राजस्थानमधून आणण्यात आली आहे. पारंपरिक कलाकुसर, सुंदर नक्षीकाम आणि आकर्षक रचनेमुळे या पालखीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भक्ती, परंपरा आणि श्रद्धेचा सुंदर संगम या पालखीतून पाहायला मिळतो.भैरवनाथांच्या भक्तीने प्रेरित होऊन ठोंबरे परिवाराने ही पालखी अर्पण करण्याचा संकल्प केला. आपल्या आराध्य दैवताच्या चरणी काहीतरी मनोभावे अर्पण करण्याची भावना या उपक्रमामागे असून, "देवाच्या चरणी सेवा हीच खरी भक्ती" या भावनेतून हा धार्मिक उपक्रम साकारण्यात आला.या वेळी बाबा ठोंबरे यांच्यासह दशरथ ठोंबरे, रघुनाथ ठोंबरे, बबन ठोंबरे विलास ठोंबरे यांनी भक्तिभावाने पालखी श्री भैरवनाथांच्या चरणी अर्पण केली. ही पालखी आणण्यासाठी सुरेश माळी रामकिसन ठोंबरे, सुरेश दानवे,मच्छिंद्र दानवे, शंकर दानवे, सुभाष ठोंबरे,अमोल ठोंबरे, पुरुषोत्तम ठोंबरे, भाऊसाहेब ठोंबरे, प्रकाश ठोंबरे,अक्षय गणगे,प्रदीप गिरी, हे युवा वर्ग राजस्थान येथे पालखी आणण्यासाठी गेले होते. या धार्मिक उपक्रमामुळे परिसरातील भाविकांमध्येही आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.नाथाची पालखी गावात आल्यानंतर, गावातील तरुणांनी ढोल ताशा्याच्या तालावरती लेझीम नृत्याचा ठेका धरला.त्यानंतर सर्वांना नाष्ट्याची सोय हरि ओम् फुड्स कंपनी तर्फे करण्यात आली.


